श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## नारायणावतार स्तोत्र



ब्रह्मा जी ने किए जो वर्णित, नारद जी को दिए बता
नारायण निज काज करण को, ये लीला अवतार गता

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**
**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**
**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

**श्रीमद्भागवतमहापुराणम्**

**द्वितीयः स्कन्धः**

**॥ अथ सप्तमोऽध्यायः ॥**

**ब्रह्मोवाच**

**यत्रोद्यतः क्षितितलोद्धरणाय बिभ्रत्,**
**क्रौडीं(न्) तनुं(म्) सकलयज्ञमयीमनन्तः ।**
**अन्तर्महार्णव उपागतमादिदैत्यं(न्),**
**तं(न्) दं(म्)ष्ट्रयाद्रिमिव वज्रधरो ददार ॥ 1॥**

**क्षितितलोद्+ धरणाय, दं(म्)ष्ट्रया+ द्रिमिव**

**ब्रह्मदेव म्हणाले-प्रलयकाला च्या पाण्यामध्ये बुडालेल्या पृथ्वीचा उद्धार करण्यासाठी अनंत भगवानां नी संपूर्ण यज्ञमय असे वराह शरीर धारण केले. पाण्यामध्ये आदिदैत्य हिरण्याक्ष लढण्यासाठी त्यांच्या समोर आला. इंद्राने जसे आपल्या वज्राने पर्वताचे पंख तोडून टाकले होते तशाच प्रकारे भगवतांनी आपल्या दाढेने हिरण्याक्षाचे तुकडे तुकडे केले .**

जातो रुचेरजनयत् सुयमान् सुयज्ञ,

आकूतिसूनुरमरानथ दक्षिणायाम् ।

लोकत्रयस्य महतीमहरद् यदाऽऽर्तिं(म्),

स्वायम्भुवेन मनुना हरिरित्यनूक्तः ॥ 2॥

आकू+ तिसू+ नुरमरा+ नथ, स्वायम्+ भुवेन, हरिरित्+ यनूक्तः

मग त्याच भगवंतांनी रुची नावाच्या प्रजापतीच्या पत्नी आकुतीच्या गर्भातून सुयज्ञ अवतार घेतला. त्या अवतारात त्यांनी दक्षिणा नावाच्या पत्नीपासून सुगम नावाचे देव निर्माण केले आणि तिन्ही लोकांचे मोठे संकट दूर केले. म्हणून स्वयंभू मनुने त्याला 'हरि' नावाने हाक मारली.

जज्ञे च कर्दमगृहे द्विज देवहूत्यां(म्),

स्त्रीभिः(स्) समं(न्)नवभिरात्मगतिं(म्) स्वमात्रे ।

ऊचे ययाऽऽत्मशमलं(ङ्) गुणसङ्गपङ्क-

मस्मिन् विधूय कपिलस्य गतिं(म्) प्रपेदे ॥ 3॥

समं(न्)नवभिरात्+ मगतिं(म्), ययाऽऽत्+ मशमलं(ङ्)

नारदा, कर्दम प्रजापतीच्या घरी देवहुतीच्या गर्भातून अन्य नऊ बहिनिंसहित कपिल नामक अवतार धारण केला. त्यांनी आपल्या मातेला आत्मसाक्षात्कार विषयक उपदेश केला त्यायोगे तिने याच जन्मामध्ये आपल्या हदयातील संपूर्ण मल तीन गुणांच्या आसक्तीचा चिखल धुऊन टाकून ती कपिल भगवानांच्या मूळ स्वरूपात विलीन झाली .मुक्ती मार्ग प्राप्त केला.

अत्रेरपत्यमभिकाङ्क्षत आह तुष्टो,

दत्तो मयाहमिति यद् भगवान् स दत्तः ।

यत्पादपङ्कजपरागपवित्रदेहा,

योगर्द्धिमापुरुभयीं(यँ) यदुहैहयाद्याः ॥ 4॥

अत्रेरपत्+ यमभिकाङ्+ क्षत, यत्पा+दपङ्कजपरा+गपवित्रदेहा, योगर्+ द्धिमा+ पुरुभयीं(यँ)

महर्षी अत्र्यांना देव पुत्ररूपात हवा होता. त्याच्यावर प्रसन्न होऊन देव एके दिवशी त्याला म्हणाला, 'मी स्वतःला तुझ्या स्वाधीन केले आहे.' त्यामुळे अवतार घेतल्यानंतर देवाचे नाव 'दत्त' (दत्तात्रेय) ठेवण्यात आले. आपल्या कमळाच्या पावलांच्या परागकणांनी त्यांचे शरीर शुद्ध करून राजा यदु आणि सहस्रार्जुन इत्यादींना योग, भोग आणि मोक्ष या दोन्ही सिद्धी प्राप्त झाल्या.

तप्तं(न्) तपो विविधलोकसिसृक्षया मे,

आदौ सनात् स्वतपसः(स्) स चतुः(स्)सनोऽभूत् ।

प्राक्कल्पसम्प्लवविनष्टमिहात्मतत्त्वं(म्),

सम्यग् जगाद मुनयो यदचक्षतात्मन् ॥ 5॥

विविधलो+ कसिसृक्षया, प्राक्कल्पसम्+ प्लवविनष्टमिहात्+ मतत्त्वं(म्)

नारद सृष्टीत विविध विश्व निर्माण करण्याच्या इच्छेने मी तपश्चर्या केली. माझ्या त्या अखंड तपश्चर्येने प्रसन्न होऊन त्यांनी सनक, सनंदन, सनातन आणि सनतकुमार हे 'सन' म्हणजे 'तपश्चर्या' असे नाव धारण केले. या अवतारात त्यांनी ऋषिमुनींना प्रलयांमुळे पहिल्या कल्पात विसरलेल्या आत्मज्ञानाचा उपदेश केला, त्यामुळे त्यांना त्यांच्या अंतःकरणातील परम सत्याचा लगेच साक्षात्कार झाला.

धर्मस्य दक्षदुहितर्यजनिष्ट मूर्त्यां(न्),

नारायणो नर इति स्वतपः(फ्)प्रभावः ।

दृष्ट्वाऽऽत्मनो भगवतो नियमावलोपं(न्),

देव्यस्त्वनङ्गपृतना घटितुं(न्) न शेकुः ॥ 6॥

दक्षदुहितर् + यजनिष्ट, देव्यस् + त्वनङ्+ गपृतना

धर्माची पत्नी दक्ष कन्या मूर्ती हिच्या गर्भातून ते नर-नारायणाच्या रूपात प्रकट झाले. त्याच्या तपश्चर्येचा प्रभाव त्याच्यासारखाच आहे. इंद्राने पाठवलेल्या अप्सरांच्या कामदेवाच्या सैन्याने त्यांच्या समोर येताच त्यांचा स्वभाव गमावला. त्या आत्म्यासदृश भगवंताच्या तपश्चर्येला ती आपल्या भावभावनांनी बाधा आणू शकली नाही.

कामं(न्) दहन्ति कृतिनो ननु रोषदृष्ट्या,

रोषं(न्) दहन्तमुत ते न दहन्त्यसह्यम् ।

सोऽयं(यँ) यदन्तरमलं(म्) प्रविशन् बिभेति,

कामः(ख्) कथं(न्) नु पुनरस्य मनः(श्) श्रयेत ॥ 7॥

दहन्+ त्यसह्यम्

नारद. शंकरासारखे महापुरुष आपल्या क्रोधित नजरेने कामदेवाला जाळून टाकतात, पण स्वतःला जाळणाऱ्या असह्य क्रोधाला ते जाळू शकत नाहीत. नर-नारायणाच्या शुद्ध अंतःकरणात प्रवेश करण्यापूर्वीच तोच राग भीतीने थरथर कापतो. मग त्यांच्या अंतःकरणात वासना कशी प्रवेश करणार?

विद्धः(स्) सपत्न्युदितपत्रिभिरन्ति राज्ञो,

बालोऽपि सन्नुपगतस्तपसे वनानि ।

तस्मा अदाद् ध्रुवगतिं(ङ्) गृणते प्रसन्नो,

दि*व्याः(स्) स्तुव*न्ति मुनयो यदुपर्यध*स्तात् ॥ 8॥

सपत् + न्युदित+ पत्रिभि+ रन्ति, सन्नुपगतस्+ तपसे, यदुपर्+ यधस्तात्

वडील राजा उत्तानपदाच्या मांडीवर बसलेल्या पाच वर्षांचा मुलगा ध्रुवाला त्याची सावत्र आई सुरुचीने कठोर शब्दांनी अपमान केला. तो सहन न झाल्याने एवढा लहान असूनही तपश्चर्या करायला तो जंगलात गेला. त्याच्या प्रार्थने ने प्रसन्न हो ऊन देव प्रकट झाला आणि त्याने ध्रुवाला ध्रुपदाचा आशीर्वाद दिला. आजही दैवी महर्षी ध्रुवावरून प्रदक्षिणा घालताना त्यांची स्तुती करत असतात.

य*द्वेनमु*त्पथगतं(न्) द्विजवाक्यव*ज्र-

वि*प्लु*ष्टपौरुषभगं(न्) निरये पत*न्तम् ।

त्रात्वार्थितो जगति पु*त्रपदं(ञ्) च लेभे,

दु*ग्धा वसूनि वसुधा सकलानि येन ॥ 9॥

यद्वेनमुत्+ पथगतं(न्), विप्लुष्टपौ+ रुषभगं(न्)

कुमार्गाला लागलेल्या वेनाचे ऐश्वर्य आणि शौर्य ब्राह्मणांच्या हुंकाररूपी वज्राने जळून भस्म झाले . तो नरकात पडू लागला . ऋषींनी प्रार्थना केल्यावर भगवतांनी त्याच्या शरीर मंथनातून पृथूच्या रूपाने अवतार धारण केला . आणि त्याची नरकात पडण्यापासून मुक्तता केली . अशा प्रकारे पुत्र शब्दाचे सार्थक केले . त्याच अवतारात पृथ्वीला गाय बनवून त्यांनी तिच्यापासून जगासाठी सर्व वनस्पती निर्माण केल्या .

नाभेरसावृषभ आस सुदेविसूनुर्-

यो वै चचार समदृग् जडयोगचर्याम् ।

य*त्पारमहं(म्)स्यमृषयः(फ्) पदमामन*न्ति*,

स्व*स्थः(फ्) प्रशान्तकरणः(फ्) परिमु*क्तस*ङ्गः ॥ 10॥

यत्पा+ रमहं(म्)स्+ यमृषयः(फ्)

नाभी महाराजांची पत्नी सुदेविचे पुत्र म्हणून भगवंत अवतरित होऊन ऋषभदेव म्हणून प्रख्यात झाले. मन संतुलित करण्यासाठी त्यांनी जड योगाचे आचरण केले.हि स्थिती सुद्धा मुक्तीची सर्वोच्च पूर्णावस्था म्हणून स्वीकारली जाते. व अश्या स्थितीमध्ये मनुष्य आपल्या आत्म्यामध्ये स्थिर होऊन पूर्णपणे समाधानी झालेला असतो.

स*त्रे ममास भगवान् हयशीरषाथो,

साक्षात् स य*ज्ञपुरु*षस्तपनीयवर्णः ।

छ*न्दोमयो मखमयोऽखिलदेवतात्मा,

वाचो बभूवुरुशतीः(श्) श्वसतोऽस्य नस्तः ॥ 11॥

यज्ञपुरुषस्+ तपनीयवर्णः, मखमयोऽ+ खिलदेवतात्मा

यानंतर तोच यज्ञपुरुष स्वतः माझ्या यज्ञात हयग्रीवाच्या रूपात अवतरला, ज्यांचे तेज सोन्यासारखे होते. देवाची ती मूर्ती म्हणजे वेदमय, यज्ञमय आणि सर्वदेवमय. वेदवाणी त्याच्या नाकपुडीतून श्वासाच्या रूपात प्रकट झाली.

मत्स्यो युगान्तसमये मनुनोपलब्धः,

क्षोणीमयो निखिलजीवनिकायकेतः ।

विस्रं(म्)सितानुरुभये सलिले मुखान्मे,

आदाय तत्र विजहार ह वेदमार्गान् ॥ 12॥

निखिलजी+ वनिका+ यकेतः, विस्रं(म्)सिता+ नुरुभये

चाक्षुष मन्वंतराच्या शेवटी भावी मनू सत्यव्रताने भगवंतांना मत्स्यरूपाने प्राप्त करून घेतले त्यावेळी पृथ्वीरूप नौकेचा आश्रय झाल्याकारणाने ते सर्व जीवांचेच आश्रय बनले प्रलयाच्या त्या भयंकर पाण्यात माझ्या मुखातून पडलेले वेद घेवून ते त्यातच विहार करीत राहिले .

क्षीरोदधावमरदानवयूथपाना-

मुन्मथ्नताममृतलब्धय आदिदेवः।

पृष्ठेन कच्छपवपुर्विदधार गोत्रं(न्),

निद्राक्षणोऽद्रिपरिवर्तकषाणकण्डूः ॥ 13॥

क्षीरोदधा+ वमरदा+ नवयूथपाना, मुन्मथ् + नता+ ममृतलब्धय

कच्छपवपुर्+ विदधार, निद्राक्षणोऽ+ द्रिपरिवर्+ तकषा+ णकण्डूः

जेव्हा प्रमुख देव आणि दानव अमृताच्या प्राप्तीसाठी क्षीरसागराचे मंथन करीत होते , तेव्हा भगवंतांनी कासवाच्या रूपाने आपल्या पाठीवर मंदार पर्वताला धारण केले . त्यावेळी पर्वताच्या फिरण्याने ' त्यांच्या पाठीला सुटलेली खाज नाहीशी झाली . त्यामुळे ते काही क्षण निद्रा सुख घेवू शकले .

त्रैविष्टपोरुभयहा स नृसिं(म्)हरूपं(ङ्),

कृत्वा भ्रमद्भ्रुकुटिदं(म्)ष्ट्रकरालवक्त्रम् ।

दैत्येन्द्रमाशु गदयाभिपतन्तमारा-

दूरौ निपात्य विददार नखैः(स्) स्फुरन्तम् ॥ 14॥

त्रैविष्टपो+ रुभयहा, भ्रमद्+ भ्रुकुटिदं(म्)ष्ट्र+ करालवक्त्रम्

दैत्येन् + द्रमाशु, गदया+ भिपतन्+ तमारा

देवाचे महाभय नाहीसे करण्यासाठी त्यांनी नृसिंहाचे रूप धारण केले . थरथरणाऱ्या भूवया आणि तीक्ष्ण दाढा यामुळ त्यांचे मुख अतिशय भयानक दिसत होते . त्यांना पाहताच हिरण्यकशिपू गदा घेवून, त्यांच्या अंगावर तुटून पडला . यावर भगवान नृसिंहानी लाबूनच त्याला पकडून आपल्या मांडीवर घेतले आणि तो धडपडत असतानाही आपल्या नखांनी त्याचे पोट फाडले .

अन्तः(स्)सरस्युरुबलेन पदे गृहीतो,

ग्राहेण यूथपतिरम्बुजहस्त आर्तः।

आहेदमादिपुरुषाखिललोकनाथ,

तीर्थश्रवः(श्) श्रवणमङ्गलनामधेय ॥ 15॥

अन्तः(स्)सरस्+ युरुबलेन, यूथपतिरम्+ बुजहस्त

आहेदमा+ दिपुरुषा+ खिललो+ कनाथ, श्रवणमङ्+ गलनामधेय

मोठ्या सरोवरात एका महाबलाढय मगरीने गर्जेंद्राचा पाय पकडला. जेव्हा थकून जावून तो घाबरला, तेव्हा त्याने आपल्या सोंडेने कमलपुराप घेवून " हे आदिपुरुषा !हे समस्त लोकांच्या स्वामी ! असा भगवंताचा धावा केला .

श्रुत्वा हरिस्तमरणार्थिनमप्रमेयश्-

चक्रायुधः(फ्) पतगराजभुजाधिरूढः ।

चक्रेण नक्रवदनं(वँ) विनिपाट्य तस्माद्-

धस्ते प्रगृह्य भगवान् कृपयोज्जहार ॥ 16॥

हरिस्+ तमरणार्+ थिनम+ प्रमेयश्, पतगरा+ जभुजा+ धिरूढः

त्याचा धावा ऐकून अनंतशक्ती भगवान चक्रपाणी गरुडाच्या पाठीवर बसून तेथे आले आणि कृपाळू भगवतांनी सुदर्शन चक्राने त्या मगरीचे तोंडफाडून टाकले . शरण आलेल्या गजेंद्राची सोंडपकडून त्याची त्या संकटातून सुटका केली .

ज्यायान् गुणैरवरजोऽप्यदितेः(स्) सुतानां(लँ),

लोकान् विचक्रम इमान् यदथाधियज्ञः।

क्ष्मां(वँ) वामनेन जगृहे त्रिपदच्छलेन,

याच्ञामृते पथि चरन् प्रभुभिर्न चाल्यः ॥ 17॥

गुणै+ रवरजोऽ+ प्यदितेः(स्), त्रिपदच्+ छलेन

भगवान वामन हे अदितीच्या मुलांपैकी सर्वात धाकटे असले तरी गुणांच्या बाबतीत ते श्रेष्ठ होते. कारण या अवतारात भगवान यज्ञपुरुषांनी त्यागाचा संकल्प सोडताच आपल्या पावलांनी संपूर्ण जगाचे मोजमाप केले होते. वामन बनून त्याने तीन पावलांनी संपूर्ण पृथ्वी घेतली, परंतु याद्वारे त्याने हे सत्य सिद्ध केले की सामर्थ्यवान लोक सुद्धा लोकांना त्यांच्या स्थानावरून हटवू शकत नाहीत, त्यांना ऐश्वर्यापासून वंचित करू शकत नाहीत.

नार्थो बलेरयमुरुक्रमपादशौच-

मापः(श्) शिखा धृतवतो विबुधाधिपत्यम् ।

यो वै प्रतिश्रुतमृते न चिकीर्षदन्य-

दात्मानमङ्ग शिरसा हरयेऽभिमेने ॥ 18॥

बले+ रयमुरु+ क्रमपा+ दशौच, विबुधा+ धिपत्यम्

हे नारदा , दैत्यराज बलीने आपल्या डोक्यावर वामनांचे चरणतीर्थ घेतले . किवा तो देवतांचा राजा होता , यात काही विशेष नाही आपल्या दिलेल्या वचनाच्या विरुद्ध काही करण्यास तयार नव्हता . एवढेच काय , भगवंतांचे तिसरे पाऊल ठेवण्यासाठी त्याने आपले मस्तक देऊन स्वतः लाही भगवंताना समर्पित केले . त्यातच खरा पुरुषार्थ आहे .

तुभ्यं(ञ्) च नारद भृशं(म्) भगवान् विवृद्ध-

भावेन साधु परितुष्ट उवाच योगम्।

ज्ञानं(ञ्) च भागवतमात्मसतत्त्वदीपं(यँ),

यद्वासुदेवशरणा विदुरञ्जसैव ॥ 19॥

भागवतमात्+ मसतत् + त्वदीपं(यँ), यद्वासुदे+ वशरणा

नारदा, तुझ्या अत्यंत प्रेमभावामुळे प्रसन्न होवून हंसाच्या रूपाने भगवंतांनी तुला योग , ज्ञान आणि आत्मतत्वाला प्रकाशित करणाऱ्या भागवत धर्माचा उपदेश केला भगवंतांच्या शरणागत भक्तांनाच हा सुलभतेने प्राप्त होतो .

चक्रं(ञ्) च दिक्ष्वविहतं(न्) दशसु स्वतेजो,

मन्वन्तरेषु मनुवं(म्)शधरो बिभर्ति ।

दुष्टेषु राजसु दमं(वँ) व्यदधात् स्वकीर्तिं(म्),

सत्ये त्रिपृष्ठ उशतीं(म्) प्रथयं(म्)श्चरित्रैः ॥ 20॥

तेच भगवंत स्वायंभूव आदि मन्वंतरांत मनूच्या रूपाने अवतार घेवून मनुवशाचे सरक्षण करीत आपल्या सुदर्शन चक्राच्या तेजाप्रमाणे दाही दिशाना विनासायास निष्कंटक असे राज्य करतात .

तिन्ही लोकांच्या वर असणाऱ्या सत्यलोकापर्यंत त्यांच्या चरित्राची उज्ज्वल कीर्ती पसरते आणि त्याच रूपात ते वेळोवेळी पृथ्वीला भारभूत झालेल्या राजांचे दमनही करतात .

धन्वन्तरिश्च भगवान् स्वयमेव कीर्तिर्-

नाम्ना नृणां(म्) पुरुरुजां(म्) रुज आशु हन्ति ।

यज्ञे च भागममृतायुरवावरुन्ध,

आयुश्च वेदमनुशास्त्यवतीर्य लोके ॥ 21॥

भागममृता+ युरवा+ वरुन्ध, वेदमनुशास्+ त्यवतीर्य

स्वतःच्या नावाने धन्य झालेले धन्वन्तरी आपल्या केवळ नावानेचमा मोठमोठ्या रोग्यांच्या रोग्यांना ताबडतोब नष्ट करतात त्यांनी देवतांना अमृत पाजून अमर केले आणि दैत्यांनी हरण केलेला यज्ञभाग देवांना पुन्हा मिळवून दिला . त्यांनीच अवतार घेवून या जगात आयुर्वेद प्रकट केला .

क्षत्रं(ङ्) क्षयाय विधिनोपभृतं(म्) महात्मा,

ब्रह्मध्रुगुज्झितपथं(न्) नरकार्तिलिप्सु ।

उद्धन्त्यसाववनिकण्टकमुग्रवीर्यस्-

त्रिः(स्)सप्तकृत्व उरुधारपरश्वधेन ॥ 22॥

ब्रह्मध्रुगुज्+ झितपथं(न्), उद्धन्+ त्यसा+ ववनिकण्+ टकमुग्रवीर्यस्

जेव्हा जगात ब्राह्मणद्रोही , आर्यांच्या मर्यादांचे उल्लंघन करणारे व त्यामुळे नरकयातना भोगू इच्छिणारे क्षत्रिय आपल्या नाशालाच दैववशात कारणीभूत झाले आणि पृथ्वीवर जणू काटेच बनून राहिले , तेव्हा भगवंतांनी महापराक्रमी परशुरामाच्या रूपात अवतीर्ण होवून आपल्या तीक्ष्ण धारेच्या परशूने एकवीस वेळी त्यांचा संहार केला .

अस्मत्प्रसादसुमुखः(ख्) कलया कलेश,

इक्ष्वाकुवं(म्)श अवतीर्य गुरोर्निदेशे ।

तिष्ठन् वनं(म्) सदयितानुज आविवेश,

यस्मिन् विरुध्य दशकन्धर आर्तिमार्च्छत् ॥ 23॥

अस्मत् + प्रसादसुमुखः(ख्), इक्ष्वा+ कुवं(म्)श, आर्तिमार्+ च्छत्

माया पती भगवान आमच्यावर कृपा करण्यासाठी भरत,शत्रुघ्न आणि लक्ष्मण या आपल्या कलांसहित श्रीरामांच्या रूपाने इक्ष्वाकुवंशात अवतीर्ण झाले .या अवतारात आपल्या पित्याच्या आजेचे पालन करण्यासाठी ते पत्नी आजि बंधू यांसह वनात गेले . त्याच वेळी त्यांच्यांशी शत्रुत्व पत्करून रावण त्यांच्या हातून मृत्युमुखी पडला .

यस्मा अदादुदधिरूढभयाङ्गवेपो,

मार्गं(म्) सपद्यरिपुरं(म्) हरवद् दिधक्षोः ।

दूरे सुहृन्मथितरोषसुशोणदृष्ट्या,

तातप्यमानमकरोरगनक्रचक्रः ॥ 24॥

अदा+ दुदधिरू+ ढभयाङ्+ गवेपो, सुहृन् + मथितरो+ षसुशो+ णदृष्ट्या

तातप्यमा+ नमकरो+ रगनक्रचक्रः

जसे भगवान शंकर त्रिपुर विमानाला जाळण्यासाठी उद्‌यूक्त झाले , तसे ज्यावेळी भगवान राम शत्रूची नगरी लंकेला भस्मसात करण्यासाठी समुद्रावर पोहोचले , त्यावेळी सीतेच्या वियोगाने क्रुद्ध झालेल्या रामांचे डोळे इतके लाल झाले की , त्यांच्या केवळ दृष्टिक्षेपाने समुद्रातील मासे, मगरी, आणि साप इत्यादी जीव पोळू लागले त्यावेळी भयाने थरथरणाऱ्या महासाग राणे त्यांना वाट करून दिली .

वक्षः(स्)स्थलस्पर्शरुग्णमहेन्द्रवाह-

दन्तैर्विडम्बितककुब्जुष ऊढहासम् ।

सद्योऽसुभिः(स्) सह विनेष्यति दारहर्तुर्-

विस्फूर्जितैर्धनुष उच्चरतोऽधिसैन्ये ॥ 25॥

वक्षः(स्)स्थलस्+ पर्शरुग् + णमहेन्द्रवाह, दन्तैर्विडम्+ बितककुब्+ जुष

विस्फूर्+ जितैर्धनुष

जेव्हा रावणाच्या कठीण छातीला टक्कर दिल्याने इंद्राचे वाहन ऐरावत याच्या दातांचा चक्काचूर होवून ते सगळीकडे पसरतील , त्यामुळे दिशाही पांढऱ्याशुभ्र होतील . तेव्हा विजयी रावण गर्वाने फुगून जाऊन हसू लागेल . आपल्या पत्नीला पळवणाऱ्या त्या रावणाचा तो उद्दामपणा भगवान श्रीराम धनुष्याच्या टणत्कारानेच प्राणासह तत्काळ नाहीसा करतील .

भूमेः(स्) सुरेतरवरूथविमर्दितायाः(ख्)

क्लेशव्ययाय कलया सितकृष्णकेशः ।

जातः(ख्) करिष्यति जनानुपलक्ष्यमार्गः(ख्)

कर्माणि चात्ममहिमोपनिबन्धनानि ॥ 26॥

सुरेतरवरू+ थविमर्दितायाः(ख्), जना+ नुपलक्ष्य+ मार्गः(ख्)

चात्+ ममहिमो+ पनिबन् + धनानि

दैत्यांच्या झुंडींनी त्रस्त झालेल्या पृथ्वीचा भार उतरवण्यासाठी कृष्णवर्ण भगवान गौरवर्ण बलरामासह अवतार ग्रहण करतील . ते आपला महिमा प्रगट करणाऱ्या अद्भूत लीला करतील त्या लीला लोकांना बिलकूल समजू शकणार नाहीत .

तोकेन जीवहरणं(य्ँ) यदुलूकिकायास्-

त्रैमासिकस्य च पदा शकटोऽपवृत्तः ।

यद् रिङ्गतान्तरगतेन दिविस्पृशोर्वा,

उन्मूलनं(न्) त्वितरथार्जुनयोर्न भाव्यम् ॥ 27॥

रिङ्गतान्+ तरगतेन, त्वितरथार्+ जुनयोर्न

बालपणातच पूतने चे प्राण हरण करणे , तीन महिन्याच्या वयात पायाने भलामोठा छकडा उलटून टाकणे आणि गुडघ्यावर रांगता रांगता आकाशाला भिडलेल्या यमलार्जून वृक्षांमध्ये जाऊन त्यांना उखडून टाकणे , अशी कर्मे भगवंताशिवाय अन्य कोणीही करू शकणार नाही .

यद् वै व्रजे व्रजपशून् विषतोयपीतान्,

पालां(म्)स्त्वजीवयदनुग्रहदृष्टिवृष्ट्या ।

तच्छुद्धयेऽतिविषवीर्यविलोलजिह्व-

मुच्चाटयिष्यदुरगं(व्ँ) विहरन् ह्रदिन्याम् ॥ 28॥

पालां(म्)स्+ त्वजी+वयदनुग्रह+ दृष्टिवृष्ट्या, तच्छुद्+ धयेऽतिविषवीर्+ यविलोलजिह्व

मुच्चाटयिष्+ यदुरगं(व्ँ)

कालियानागच्या विषाने दूषित झालेले यमुनेचे पाणी पिऊन जेव्हा वासरे आणि गुराखी मरतील, तेव्हा तो आपल्या प्रेमळ कृपेने त्यांना पुन्हा जिवंत करील आणि यमुनेचे पाणी शुद्ध करण्यासाठी, तो त्यामध्ये आणि सामर्थ्याने फिरेल. तिथून कालियानाग हाकलून देतील.

तत् कर्म दिव्यमिव यन्निशि निःशयानं(न्),

दावाग्निना शुचिवने परिदह्यमाने ।

उन्नेष्यति व्रजमतोऽवसितान्तकालं(न्),

नेत्रे पिधाय्य सबलोऽनधिगम्यवीर्यः ॥ 29॥

व्रजमतोऽ+ वसितान् + तकालं(न्), सबलोऽ+ नधिगम् + यवीर्यः

त्याच दिवशी रात्री जेव्हा सर्वलोक तेथेच यमुनातटावर निद्रिस्त होतील आणि दावाग्नी भडकल्याने सर्व मुंजवन चारी बाजूंनी जळू लागेल , तेव्हा बलरामासह , त्या प्राण संकटात सापडलेल्या

व्रजवासीयांना त्यांचे डोळे बंद करावयास सांगून ते त्यांना गोकुळात नेतील ही त्यांची लीला तर अलौकिकच असेल . कारण त्यांची शक्ती अचिंत्य आहे .

**गृह्णीत यद् यदुपबन्धममुष्य माता,**

**शुल्बं(म्) सुतस्य न तु तत् तदमुष्य माति ।**

**यज्जृम्भतोऽस्य वदने भुवनानि गोपी,**

**सं(वँ)वीक्ष्य शङ्कितमनाः(फ्) प्रतिबोधिताऽऽसीत् ॥ 30॥**

**यदुपबन्+धममुष्य, प्रतिबो+ धिताऽऽसीत्**

त्यांना बाधण्यासाठी म्हणून त्यांची माता जी जी दोरी आणील , ती ती त्यांच्या पोटाला पुरणार नाही . तसेच जांभई देते वेळी श्रीकृष्णांच्या मुखामध्ये चौदा भुवने पाहून यशोदा प्रथम भयग्रस्त होईल , पण नंतर ते तिला आपल्या सामर्थ्यांचा बोध करवतील .

**नन्दं(ञ्) च मोक्ष्यति भयाद् वरुणस्य पाशाद्,**

**गोपान् बिलेषु पिहितान् मयसूनुना च ।**

**अह्न्यापृतं(न्) निशि शयानमतिश्रमेण,**

**लोकं(वँ) विकुण्ठमुपनेष्यति गोकुलं(म्) स्म ॥ 31॥**

**विकुण्ठ+ मुपनेष्यति**

ते नंदबाबांना अजगराच्या भयापासून आणि वरुणाच्या पाशातून सोडवतील . मय दानवाचा पुत्र व्योमासुर जेव्हा गोपबालकांना पहाडाच्या गुहेत बंद करून ठेवील , तेव्हा ते त्यांना तेथून वाचवतील . दिवसभर कामधंद्यात व्यग्र असणाऱ्या आणि असत थकून भागून रात्री झोपून जाणाऱ्या गोकुळातील लोकांना , ते आपल्या परमधामाला घेऊन जातील .

**गोपैर्मखे प्रतिहते व्रजविप्लवाय,**

**देवेऽभिवर्षति पशून् कृपया रिरक्षुः ।**

**धर्तोच्छिलीन्ध्रमिव सप्त दिनानि सप्त-**

**वर्षो महीध्रमनघैककरे सलीलम् ॥ 32॥**

**धर्तोच् + छिलीन्+ ध्रमिव, महीध्र+ मनघैककरे**

हे निष्पाप नारदा , जेव्हा श्रीकृष्णाच्या सल्ल्यावरून गोपलोक इंद्रासाठीचा यज्ञ बंद करतील , तेव्हा इंद्र व्रजभूमी बुडवण्यासाठी चारी बाजूंनी मुसळधार पाऊस पाडण्यास सुरुवात करील . त्यावेळी गोपांचे आणि त्यांच्या पशूंचे रक्षण करण्यासाठी सात वर्षाचे कृपाळू भगवंत सात दिवसापर्यंत गोवर्धन पर्वत , एकाच हाताने पावसाळी छत्री धरल्याप्रमाणे लीलेने धारण करतील .

क्रीडन् वने निशि निशाकररश्मिगौर्यां(म्),

रासोन्मुखः(ख्) कलपदायतमूर्च्छितेन ।

उद्दीपितस्मररुजां(वँ) व्रजभृद्वधूनां(म्),

हर्तुर्हरिष्यति शिरो धनदानुगस्य ॥ 33॥

निशा+ कररश्+ मिगौर्यां(म्), कलपदा+ यतमूर्च्छितेन,

उद्दीपितस्+ मररुजां(वँ), व्रजभृद्+ वधूनां(म्)

वृदावनात विहार करताना रात्रीच्या वेळी रास करण्याच्या इच्छेने जेव्हा चंद्राचे टिपूर चांदणे सगळीकडे पसरलेले असेल, तेव्हाते आपल्या बासरीवर मधुर संगीताची दीर्घ तान घेतील ही तान ऐकून प्रेम विव्हल होऊन आलेल्या गोपींचे कुबेराचा सेवक शंखचूड जेव्हा हरण करील , तेव्हा ते त्याचे मस्तक उडवतील .

ये च प्रलम्बखरदर्दुरकेश्यरिष्ट-

मल्लेभकं(म्)सयवनाः(ख्) कुजपौण्ड्रकाद्याः ।

अन्ये च शाल्वकपिबल्वलदन्तवक्त्र-

सप्तोक्षशम्बरविदूरथरुक्मिमुख्याः ॥ 34॥

प्रलम्ब+ खरदर्+ दुरकेश्+ यरिष्ट, कुजपौण्ड्र+ काद्याः

शाल्+ वकपिबल्+ वलदन्तवक्त्र, सप्तो+ क्षशम्+ बरविदू+ रथरुक्मिमुख्याः

ये वा मृधे समितिशालिन आत्तचापाः(ख्),

काम्बोजमत्स्यकुरुकैकयसृञ्जयाद्याः।

यास्यन्त्यदर्शनमलं(म्) बलपार्थभीम-

व्याजाह्वयेन हरिणा निलयं(न्) तदीयम् ॥ 35॥

काम्बो+ जमत्स्य+ कुरुकै+ कयसृञ्+ जयाद्याः, यास्यन्त्य+ दर्शनमलं(म्)

आणि इतर अनेक राक्षस जसे प्रलंबासुर, धेनुकासुर, बकासुर, केशी, अरिष्टसुर, इ. चाणूर इ. पैलवान, कुवलयपीड हत्ती, कंस, कालयवन, भौमासुर, मिथ्यावसुदेव, शाल्व, द्विविद वानर, बलवल, सातनवांचा राजा बैलजित, दैत्य. , शंबरासुर, विदुरथ आणि रुक्मी इत्यादी देशांचे राजे आणि कंबोज, मत्स्य, कुरु, कैकेय आणि श्रींजय इत्यादी देशांचे राजे आणि जे देवही धनुष्य परिधान करून रणांगणात प्रकट होतील, ते सर्व बलराम, भीमसेन आणि अर्जुन आदी जणांकडून मारले जाईल आणि त्याच्याभगवंताच्या निवासस्थानी जाईल.

कालेन मीलितधियामवमृश्य नृणां(म्),

स्तोकायुषां(म्) स्वनिगमो बत दूरपारः ।

आविर्हितस्त्वनुयुगं(म्) स हि सत्यवत्यां(वँ),

वेदद्रुमं(वँ) विटपशो विभजिष्यति स्म ॥ 36॥

मीलितधिया+ मवमृश्य, आविर्+ हितस्+ त्वनुयुगं(म्)

काळच्या ओघात लोकांची ग्रहण शक्ती कमी होत जाते . आयुष्यही कमी होऊ लागते त्यावेळी भगवंत असे पाहतात की , आता हे लोक माझे तत्व सांगणारी वेदवाणी समजण्यास असमर्थ आहेत तेव्हा प्रत्येक कल्पामध्ये सत्यवतीच्या ठिकाणी व्यासांच्या रूपाने प्रगट होऊन ते वेदरूपी वृक्षाचे विभिन्न शांखामध्ये विभाजन करतील .

देवद्विषां(न्) निगमवर्त्मनि निष्ठितानां(म्),

पूर्भिर्मयेन विहिताभिरदृश्यतूर्भिः।

लोकान् घ्नतां(म्) मतिविमोहमतिप्रलोभं(वँ),

वेषं(वँ) विधाय बहु भाष्यत औपधर्म्यम् ॥ 37॥

विहिता+ भिरदृश्+ यतूर्भिः, मतिविमो+ हमति+ प्रलोभं(वँ)

देवांचे शत्रू सुद्धा वेदांचा आधार घेतील आणि मदनवांनी बांधलेल्या अदृश्य गतीच्या नगरांमध्ये राहून लोकांचा नायनाट करू लागतील, तेव्हा देव बुद्धाच्या रूपात अनेक उपधम्मांचा उपदेश करतील .

यर्ह्यालयेष्वपि सतां(न्) न हरेः(ख्) कथाः(स्) स्युः(फ्),

पाखण्डिनो द्विजजना वृषला नृदेवाः।

स्वाहा स्वधा वषडिति स्म गिरो न यत्र,

शास्ता भविष्यति कलेर्भगवान् युगान्ते ॥ 38॥

यर्ह्या+लयेष्वपि

कलियुगाच्या शेवटी जेव्हा सत्पुरुषाच्या घरी सुद्धा भगवंताचे कथा-किर्तन होणार नाही . ब्राह्मण , क्षत्रिय आणि वैश्य हे नास्तिक आणि शूद्र राजे होतील . एवढेच काय पण कोठेही स्वाहा ' स्वधा आणि वषट्काराचा ध्वनीही ऐकू येणार नाही तेव्हा कलियुगाला शासन करण्यासाठी भगवंत कल्की " अवतार ग्रहण करतील .

सर्गे तपोऽहमृषयो नव ये प्रजेशाः(स्),

स्थाने च धर्ममखमन्वमरावनीशाः।

अन्ते त्वधर्महरमन्युवशासुराद्या,

मायाविभूतय इमाः(फ्) पुरुशक्तिभाजः ॥ 39॥

धर्ममखमन्+ वमरा+ वनीशाः, त्वधर्+ महरमन्+ युवशा+ सुराद्या

जेव्हा जगाच्या निर्मितीची वेळ येते, तेव्हा तपस्या स्वरूपात, नऊ प्रजापती, मरीचि आणि माझ्यासारखे ऋषी; जेव्हा विश्वाच्या रक्षणाची वेळ येते तेव्हा सर्वशक्तिमान ईश्वराची केवळ माया रूपे धर्म, विष्णू, मनू, देव आणि राजे यांच्या रूपात प्रकट होतात आणि जेव्हा विश्वाच्या विनाशाची वेळ येते तेव्हा केवळ माया सर्वशक्तिमान देवाचे रूप अधर्म, रुद्र आणि क्रोध्वाश नावाचे साप आणि राक्षस इत्यादी रूपात प्रकट होते.

विष्णोर्नु वीर्यगणनां(ङ्) कतमोऽर्हतीह,

यः(फ्) पार्थिवान्यपि कविर्विममे रजां(म्)सि ।

चस्कम्भ यः(स्) स्वरहसास्खलता त्रिपृष्ठं(यँ),

यस्मात् त्रिसाम्यसदनादुरु कम्पयानम् ॥ 40॥

स्वरहसास्+ खलता, त्रिसाम्+ यसदना+ दुरु

पृथ्वीवरील एक एक धूलिकण मोजू शकणाराही कोणता विद्वान भगवतांच्या शक्तीची गणना करू शकेल ? जेव्हां भगवंत त्रिविक्रम अवतार घेऊन त्रैलोकय पादाक्रांत करीत होते , त्यावेळी त्यांच्या पावलांच्या अफाट वेगामुळे प्रकृतिरूप अंतिम आवरणापासून ते सत्यलोकापर्यंत सर्व ब्रह्मांड थरथर कापू लागले होते तेव्हा त्यांनीच आपल्या शक्तीने त्याला स्थिर केले .

नान्तं(वँ) विदाम्यहममी मुनयोऽग्रजास्ते,

मायाबलस्य पुरुषस्य कुतोऽपरे ये ।

गायन् गुणान् दशशतानन आदिदेवः(श्),

शेषोऽधुनापि समवस्यति नास्य पारम् ॥ 41॥

समस्त सृष्टीची रचना आणि संहार करणारी माया त्यांची एक शक्ती आहे . अश्या अनंत शकतींचा आश्रय असलेल्या त्यांच्या स्वरूपाला मी जाणत नाही . तुझे ज्येष्ठ बंधू सनकादिकही जानत नाहीत . तर इतर कोण जाणू शकेल ? आदिदेव भगवानशेष सहस्त्र मुखांनी त्यांच्या गुणांचे गायन करीत आहे i परंतू अजूनही त्याला त्यांचा पार लागलेला नाही .

येषां(म्) स एव भगवान् दययेदनन्तः(स्),

सर्वात्मनाऽऽश्रितपदो यदि निर्व्यलीकम् ।

ते दुस्तरामतितरन्ति च देवमायां(न्),

नैषां(म्) ममाहमिति धीः(श्) श्वशृगालभक्ष्ये ॥ 42॥

सर्वात्मनाऽऽ+ श्रितपदो, दुस्तरा+ मतितरन्ति, श्वशृगा+ लभक्ष्ये

जे निष्कपट भावाने सर्वस्वी त्यांच्या चरणांचा आश्रय घेतात , त्यांच्यावर ते अनंतभगवान स्वतःच दया करतात . असे भक्तच त्यांची दुस्तर माया तरून जातात . आणि अश्या भक्तांचीच का कोल्ह्या कुत्र्यांचे भक्ष्य असलेल्या देहाविषयी ' मी , माझे ' ही बुद्धी असत नाही .

वेदाहमङ्ग परमस्य हि योगमायां(यँ),

यूयं(म्) भवश्च भगवानथ दैत्यवर्यः ।

पत्नी मनोः(स्) स च मनुश्च तदात्मजाश्च,

प्राचीनबर्हिर्ऋभुरङ्ग उत ध्रुवश्च ॥ 43॥

प्राचीनबर्+ हिर्+ ऋभुरङ्ग

प्रिय नारदा , परमपुरुषाच्या त्या योगमायेला मी , तुम्ही , भगवान शंकर , दैत्य कुलभूषण प्रल्हाद , शतरूपा , मनू , मनुपुत् , प्राचीन बर्ह , ऋभू , आणि ध्रूव हे जाणतात .

इक्ष्वाकुरैलमुचुकुन्दविदेहगाधि-

रघ्वम्बरीषसगरा गयनाहुषाद्याः ।

मान्धात्रलर्कशतधन्वनुरन्तिदेवा,

देवव्रतो बलिरमूर्त्तरयो दिलीपः ॥ 44॥

इक्ष्वाकुरै+ लमुचुकुन्द+ विदेहगाधि, रघ्वम्+ बरीषसगरा

मान्धात्रलर्+ कशतधन्+ वनुरन्तिदेवा, बलिरमूर्त्+ तरयो

सौभर्युतङ्कशिबिदेवलपिप्पलाद-

सारस्वतोद्धवपराशरभूरिषेणाः ।

येऽन्ये विभीषणहनूमदुपेन्द्रदत्त-

पार्थार्ष्टिषेणविदुरश्रुतदेववर्याः ॥ 45॥

सौभर्+ युतङ्कशिबिदे+ वलपिप्पलाद, सारस्वतोद्+ धवपराशरभू+ रिषेणाः

विभीषणहनू+ मदुपेन्+ द्रदत्त, पार्थार्ष्टिषे+ णविदुर+ श्रुतदेववर्याः

यांशिवाय इक्ष्वाकु, पुरुरवा, मुचुकुंद, जनक, गधी, रघु, अंबरीष, सागर, गया, ययाती इ. आणि मांधाता, अलरका, शतधन्वा, अनु, रंतिदेव, भीष्म, बळी अमृतय, दिलीप, सौभरी, उत्तंक, शिबी, देवल. , पिप्पलद , सारस्वत , उद्धव , पराशर , भूरीशेन आणि विभीषण , हनुमान , शुकदेव , अर्जुन , अर्ष्टिशें , विदुर आणि श्रुतदेव वगैरे महात्म्यांनाही माहीत आहे.

ते वै विदन्त्यतितरन्ति च देवमायां(म्),

स्त्रीशूद्रहूणशबरा अपि पापजीवाः ।
यद्यद्भुतक्रमपरायणशीलशिक्षास्-
तिर्यग्जना अपि किमु श्रुतधारणा ये ॥ 46॥

विदन्+ त्यतितरन्ति, स्त्रीशू+ द्रहूणशबरा
यद्यद्भुत+ क्रमपरा+ यणशी+ लशिक्षास्

ज्यांना भगवंतांच्या प्रेमी भक्तांसारखा स्वभाव बनविण्याचे शिक्षण मिळालेले असते , ते स्त्रिया , शूद्र , हूण , भिल्ल आणि पापांमुळे पशु - पक्षी आदि योनीत जन्मलेले सुद्धा भगवतांच्या मायेचे स्वरूप जाणतात आणि या संसार सागरातून कायमचे तरून जातात . तर जे लोक वेदविहित सदाचाराचे पालन करतात , त्यांच्या बद्दल काय सांगावे ?

शश्वत् प्रशान्तमभयं(म्) प्रतिबोधमात्रं(म्),
शुद्धं(म्) समं(म्) सदसतः(फ्) परमात्मतत्त्वम् ।
शब्दो न यत्र पुरुकारकवान् क्रियार्थो,
माया परैत्यभिमुखे च विलज्जमाना ॥ 47॥

परमात्म्याचे वास्तविक रूप हे स्थिर, शांत, निर्भय आणि केवळ ज्ञानाच्या रूपात आहे. त्यात ना भ्रमाची घाण आहे ना त्यातून निर्माण झालेली विषमता. तो सत्य आणि असत्याच्या दोन्ही पलीकडे आहे. कोणत्याही वैदिक किंवा धर्मनिरपेक्ष शब्दाला तिथे प्रवेश नाही. तसेच विविध माध्यमांद्वारे पूर्ण केलेल्या कर्माचे परिणाम. तिथे पोहोचू शकत नाही. इतकंच काय, खुद्द मायाही त्याच्यासमोर जाऊ शकत नाही, ती लाजेने पळून जाते.

तद् वै पदं(म्) भगवतः(फ्) परमस्य पुं(म्)सो,
ब्रह्मेति यद् विदुरजस्रसुखं(वँ) विशोकम् ।
सध्र्यङ् नियम्य यतयो यमकर्तहेतिं(ञ्),
जह्युः(स्) स्वराडिव निपानखनित्रमिन्द्रः ॥ 48॥

निपा+ नखनित्रमिन्द्रः

ते परमपुरुष भगवंताचे सर्वोच्च स्थान आहे. महात्मे त्यांना ब्रह्मदेवाच्या रूपात पाहतात, जो सदैव आनंदी आणि दुःखरहित असतो. संयमी पुरुष त्यांचे चित्त त्याच्यामध्ये एकाग्र करून स्थित होतात. ज्याप्रमाणे इंद्र स्वतः ढगाच्या रूपात उपस्थित राहून पाण्यासाठी विहीर खोदण्यासाठी कुदळ ठेवत नाही, त्याचप्रमाणे तो गूढता दूर करणारी ज्ञानाची साधनेही मागे ठेवतो.

स श्रेयसामपि विभुर्भगवान् यतोऽस्य,
भावस्वभावविहितस्य सतः(फ्) प्रसिद्धिः ।

**देहे स्वधातुविगमेऽनुविशीर्यमाणे,**

**व्योमेव तत्र पुरुषो न विशीर्यतेऽजः ॥ 49॥**

**भावस्वभा+ वविहितस्य, स्वधा+ तुविगमेऽ+ नुविशीर्+ यमाणे**

**सर्व कर्माचे फळ फक्त देवच देतो. कारण मनुष्य आपल्या स्वभावानुसार जी सत्कर्म करतो, ती सर्व त्याच्या प्रेरणेने घडतात. या शरीरात राहणाऱ्या पंचभूतांच्या वियोगामुळे जेव्हा हे शरीर नष्ट होते, तेव्हा त्यात राहणारा अजन्मा मनुष्यही आकाशासारखा नष्ट होत नाही.**

**सोऽयं(न्) तेऽभिहितस्तात, भगवान् विश्वभावनः।**

**समासेन हरेर्नान्य- दन्यस्मात् सदसच्च यत् ॥ 50॥**

**पुत्रा नारदा , केवळ संकल्पाने विश्वाची रचना करणाऱ्या षडैश्वर्य संपन्न श्रीहरीचे वर्णण संक्षेपाने मी तुझ्यासमोर केले . जो काही कार्य - कारणभाव किंवा - अभाव आहे . असे असूनही ते त्याच्यापासून अलिप्त ही आहेत .**

**इदं(म्) भागवतं(न्) नाम, यन्मे भगवतोदितम् ।**

**सं(ङ्)ग्रहोऽयं(वँ) विभूतीनां(न्), त्वमेतद् विपुलीकुरु ॥ 51॥**

**परमेश्वराने मला सांगितलेला हा 'भागवत' आहे. त्यात देवाच्या व्यक्तिमत्त्वांचे संक्षिप्त वर्णन आहे. तुम्ही त्याचा विस्तार करा.**

**यथा हरौ भगवति, नृणां(म्) भक्तिर्भविष्यति ।**

**सर्वात्मन्यखिलाधारे, इति सङ्कल्प्य वर्णय ॥ 52॥**

**सर्वात्मन्+ यखिलाधारे**

**जेणेकरून सर्वांचा आश्रय आणि सर्वस्वरूप भगवान श्रीहरींच्या ठिकाणी लोकांची भक्ती निर्माण होईल , अश्याप्रकारे याचे वर्णन कर .**

**मायां(वँ) वर्णयतोऽमुष्य, ईश्वरस्यानुमोदतः ।**

**शृण्वतः(श्) श्रद्धया नित्यं(म्), माययाऽऽत्मा न मुह्यति ॥ 53॥**

**वर्णयतोऽ+ मुष्य, ईश्वरस्या+ नुमोदतः**

**जे लोक भगवंताच्या अकल्पनीय शक्ती मायेचे वर्णन किंवा इतरांनी केलेले वर्णन मान्य करतात किंवा ते दररोज भक्तिभावाने ऐकतात, त्यांचे मन कधीही मायेने मोहात पडत नाही.**

**इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(न्)**

**द्वितीयस्कन्धे ब्रह्मनारदसं(वँ)वादे सप्तमोऽध्यायः॥**

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥
ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥

